महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ**
शासकीय तंत्र निकेतन इमारत, क विभाग, दुसरा मजला,
49 खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई 400 051.
दूरध्वनी : 022 - 2647 3818 **Web site : www.msbve.gov.in** **Email : msbve2003@yahoo.com**

क्रमांक : मराव्यशिपमं/का-12 /2019 / 1191 दिनांक :- 03/12/2019

## परिपत्रक :

विषय : व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे अभ्यासक्रम शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत समाविष्ट असल्याबाबत...

संदर्भ : 1) संचालनालयाचे पत्र क्र.10/एटीएस/2018/प्र.क्र.9/57, दि.19/3/2018
2) DGET चे पत्र क्र. MSDE/18013/06/ATS/EXAM/2018-TTC, दि.26/9/2018.
3) संचालनालयाचे पत्र क्र.10/एटीएस/2019/प्र.क्र.2/06, दि.15/1/2019

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कळविण्यांत येते कि, भारत सरकारद्वारा दि.7/9/2017 अन्वये निर्गमित शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाच्या अभ्यासक्रमांना अधिनियत 1961 अंतर्गत शिकाऊ उमेदवारी योजना लागू करण्यांत आलेली असल्याचे राजपत्र www.apprenticeship.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द झालेले आहे. तसेच वरील संदर्भाधिन पत्र क्र.1 अन्वये आपणांस सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने आपण कार्यवाही केली असेल अशी या कार्यालयाची धारणा आहे.

महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाच्या अभ्यासक्रम पूर्ण करणा-या प्रशिक्षणार्थ्यांना शिकाऊ उमेदवारी योजनेचा लाभ मिळत नसल्याची तक्रार संस्थांकडून वारंवार होत असल्यामुळे त्या अनुषंगाने संदर्भिय पत्र क्र.3 अन्वये संचालनालय स्तरावरुन खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यांत आल्या आहेत.

1) अभ्यासक्रम पूर्ण करणा-या प्रशिक्षणार्थ्यांनी पोर्टलवर रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक आहे. सदर व्यवसाय www.appernticeship.gov.in या पोर्टलवर अपलोड करण्यांत आलेले आहेत.
2) रजिस्ट्रेशन करतांना प्रशिक्षणार्थ्यांनी Candidate Type मध्ये Others हा पर्याय निवडून प्रशिक्षणार्थ्यांची माहिती भरणे आवश्यक आहे.
3) MSBVE अंतर्गत मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र पूर्ण करणा-या प्रशिक्षणार्थ्यांना भारत राजपत्र अधिनियम दि.8/9/2017 अन्वये रकाना क्र.7 प्रमाणे शिकाऊ उमेदवारीकरिता सूट (Rebeat) दिलेली आहे. (सोबत अधिनियम भारत सरकार राजपत्र जोडण्यांत येत आहे.)
4) अनु.क्र.2 प्रमाणे Others मध्ये नोंदणी करणा-या प्रशिक्षणार्थ्याला DGET चे पत्र क्र. MSDE / 18013 / 06 / ATS / EXAM/2018-TTC,दि..26/9/2018 अन्वये परीक्षेसाठी फ्रेशर प्रशिक्षणार्थ्यांप्रमाणे चारही विषय घेऊन परीक्षा देणे बंधनकारक आहे. (पत्राची प्रत सोबत जोडण्यांत येत आहे.)

- **भरती/मेळावा आयोजित करतांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाच्या अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचाही विचार करण्यांत यावा, याची जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी कटाक्षाने काळजी घ्यावी.**

( एस. के. वायदंडे )
सचिव,
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई.

प्रत :-
1) सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरिता.
2) अंशकालीन प्राचार्य, सर्व मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरिता.
3) संगणक विभाग यांनी सदर परिपत्रक मंडळाच्या वेबसाईटवर प्रदर्शित करावे.
4) परीक्षा विभाग यांना माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.